भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-३०/०७/२०१७

# प्रेसनोट.

## भारती विद्यापिठ पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी चोरी करणारे आरोपी अटकेत
भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दि.२७/०७/२०१७ रोजी पो.उप-निरी शिवदास गायकवाड त्यांचे पथकासह पोलीस ठाणे हददीत होणारे घरफोडयांना प्रतिबंध व्हावा या अनुषंघाने पेट्रोलींग करीत असताना पोलिस **कर्मचारी प्रदीप गुरव व विनोद भंडलकर** यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सुमारे ८ ते १० दिवसापुर्वी सुखसागरनगर राजस सोसायटी भागात रात्रीच्या वेळी चोरी केलेली असुन त्यांचेकडे त्या चोरीमधील लॅपटॉप असुन ते विकण्यासाठी गि-हाईक शोधत आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री विजयसिंह गायकवाड सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी दिल्याने बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले ठिकाणी बातमीतील इसम थांबले असल्याचे दिसल्याने बातमीप्रमाणे स्टाफचे मदतीने त्यांना जागीच पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव पत्ता १). दिपक उत्तम डाखोरे वय.१९ वर्ष रा.हनुमानचाळ जाधव यांचे घरात राजीव गांधीनगर अप्पर इंदीरानगर बिबवेवाडी पुणे व लॅपटॉप हातात असणारे इसमाने त्याचे नाव पत्ता विकास दत्तात्रय कापसे वय.२० वर्ष रा. श्रेयसनगर अप्पर इंदीरानगर बसडेपो समोर बिबवेवाडी पुणे यांना ताब्यात घेतलेले असुन त्यांचे ताब्यात एक लॅपटॉप मिळाला असून त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी आणखी घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबुल केल्याने त्यांचेकडून एकूण **दोन लॅपटॉप व चार मोबाईल हॅन्डसेट व सोन्याचे दागिने असा एकूण ३,७१,०००/- चा माल जप्त करून भारती विद्यापिठ पोलीस ठाणेकडील घरफोडीचे दहां गुन्हे उघडकीस** आणले असून सदरचे आरोपी हे रेकॉडवरील गुन्हेगार असून दाखल गुन्हयाचा पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो, अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विजयसिंह गायकवाड सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड, पो.कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर,भिमराव पुरी, गणेश सुतार, श्रीधर पाटील, समीर बागसिराज,बाबा नरळे यांचे पथकाने केलेली आहे.**